माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२३/M/००३५७६**

**अपिलार्थी श्री. नामदेव लक्ष्मण दोरूगडे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-१**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
प्रशासकीय इमारत, सहकार कक्ष,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व) मुंबई -४०० ०५१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक (पूर्व व पश्चिम उपनगरे)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
तळ मजला, सहकार कक्ष, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व) मुंबई -४०० ०५१

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०७.०५.२०२५**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित(प्रतिनिधी)
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २०.०७.२०२३ | १७.०८.२०२३ | २९.०८.२०२३ | १९.१०.२०२३ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०१.१२.२०२३ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १७.०८.२०२३ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. १९.१०.२०२३ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. २०.०७.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जयप्रकाशनगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., विद्याविहार (पुर्व), मुंबई या संस्थेची मा. उच्च न्यायालयाचे आदेशान्वये सन २००६ मध्ये करण्यात आलेल्या पडताळणीच्या अहवालाची माहिती संबंधीत ३ मुद्यांची माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि.१७.०८.२०२३ रोजी २ मुद्यांची माहिती उपलब्ध नसल्याने पुरविता येत नाही असे कळविले व एका मुद्याची माहिती पुरविली. अपिलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. २९.०८.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.१०.२०२३ रोजी जन माहिती अधिकारी यांनी नियमानुसार गहाळ झालेल्या धारिकेला पुर्नजिवित करण्याकरीता कार्यवाही करावी. अभिलेखात माहिती उपलब्ध नसल्याने सद्यस्थिती देता येणे शक्य नाही असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित असून अपिलार्थी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. ०७.०५.२०२५ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, मा. उच्च न्यायालयाने स्थळ परिक्षणाचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे स्थळ परिक्षण अहवाल अभिलेखात उपलब्ध असणे आवश्यक आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेशात नमुद केले की, अभिलेखात माहिती उपलब्ध नसल्याने सद्यस्थितीत देता येणे शक्य नाही. हे विसंगत आहे.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी जन माहिती अधिकारी यांचे लेखी निवेदन दि.०७.०५.२०२५ आयोगासमोर करुन नमुद केले व सदर प्रकरणी वेळेची मागणी केली. त्यांची मागणी मान्य करण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या लेखी निवेदनासह वस्तुस्थिती स्पष्ट करावी.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २९.०५.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

**मुंबई**
**दिनांक : ०८.०५.२०२५**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**अपील क्र. MHSICMU/२०२३/M/००३५७६**
**अपिलार्थी श्री. नामदेव लक्ष्मण दोरुगडे**

## सुनावणी दिनांक : २९.०५.२०२५ (In continuation of order dt ०८.०५.२०२५)

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्ट नुसार दि. १७.०५.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी जन माहिती अधिकारी यांचे लेखी निवेदन दि. ०७.०५.२०२५ आयोगासमोर करुन नमूद केले व सदर प्रकरणी वेळेची मागणी केली. त्यांची मागणी मान्य करण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या लेखी निवेदनासह वस्तुस्थिती स्पष्ट करावी असे आदेशित केले होते.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांना नोटीस प्राप्त असून कोणतीही पूर्वसूचना न देता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी त्यांचे दि. २८.०५.२०२५ रोजीचे लेखी निवेदन आयोगासमोर सादर करुन असे नमूद केले की, अपिलकर्ता यांनी मागणी केलेली माहिती मा. उच्च न्यायालयाने स्थळ परिक्षणाचे आदेश दिले होते. त्याअनुषंगाने या कक्षाकडील दि. २९.११.२००६ रोजीच्या तपासणी पथकाने अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालाची प्रत अपिलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आता त्यांच्या अभिलेखावर उपलब्ध असलेली स्थळ परिक्षणाच्या अहवालाची प्रत आदेशप्राप्तीच्या १० दिवसात नोंदणीकृत टपालाने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७(६) अन्वये निशुल्क पाठविण्यात यावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

### आदेश

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

**मुंबई**
**दिनांक : २९.०५.२०२५**